श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,व रुग्णालय,यवतमाळ.
SHRI.VASANTRAO NAIK GOVT.MEDICAL COLLAGE.& HOSPITAL, YAVATMAL

जा.क्र. शावैमय / किरकोळ भांडार / महा व रुग्णालय / 11880/ 2024 दि.20/ 12/ 2024

## रुग्णालयातील कच–याची विल्हेवाट लावण्याकरीता ट्रॅक्टर ट्रॅली व वाहक सहित वाहन भाडे तत्वावर मिळण्याकरीता जाहिर ई–दरपत्रक सुचना

श्री वंसतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयातील विविध वार्डमधील कचऱ्यांची विल्हेवाट लावण्याकरीता ट्रॅक्टर ट्रॉली, वाहक सहित त्यांचे दर एक वर्ष कालावधी करिता निश्चित करुन ठेवण्याकरिता इच्छुक पुरवठादारांकडुन दरपत्रक मागण्यिात येत आहे. सदर कालावधी दरनिश्चित पत्र निघाल्याच्या दिवसापासुन एक वर्षा करिता राहील.

सद्यस्थितीत रुग्णालयातील विविध वार्डमधील कचरा मोठया प्रमाणात साठुन असल्याने तातडीन पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराकडून सदरची मोहरबंद दरपत्रके या संस्थास्तरावर दर पत्रके सादर करण्यात यावे.सदर दरपत्रक जाहीरातीमध्ये न्युनतम ठरणाऱ्या पुरवठादारास आदेश प्राप्त होताच त्याच दिवसापासून ट्रॅक्टर ट्रॉली, वाहक सहित उपस्थित करणे बंधनकारक राहील. अन्यथा आपली आदेश रदद करुन इतर न्युनतम ठरणाऱ्या निविदाधारकास आदेश देण्यात येईल.

1 )**तांत्रीक लिफाफा:**या लिफाफा मध्ये पुरवठादाराने ज्या फर्म/व्यक्तीच्या नावाने ट्रॅक्टर व ट्रॉली वाहनाची आर.सी.असेल त्याच नावाने पॅन कार्ड ,आधार कार्ड, बॅंक पासबूक छायांकित प्रत, वाहनांचे आर.सी. पुस्तक, या कागदपत्राच्या छायाकिंत प्रती, मोहोरबंद करण्यात यावा त्यावर स्पष्ट शब्दात तांत्रीक बाबीचा लिफाफा असे नमुद करुन स्वतःचे नाव, पत्ता व भ्रमणध्वनी लिहावा व तो मोहोर बंद करावा अन्यथा अग्राहय समजण्यात येईल.

२)**किंमतीचा लिफाफाः** सदरचा लिफाफामध्ये वाहनांचे प्रती ट्रिप करीता ट्रॅक्टर ट्रॉली, डिझेल व वाहकसहीत भाडे सर्व बाबीसह समाविष्ट करुन दर टाकण्यात यावे. वा टाकुन तो माहेरबंद करण्यात यावा त्यावर वाहनभाडेकरीता दर असे नमुद करुन स्वतःचे नाव व पत्ता लिहावा व ता देखील मोहोर बंद करण्यात यावा. अन्यथा अग्राहय समजण्यात येईल.

उपरोक्त दोनही लिफाफे एका मोठया लिफाफया मध्ये टाकुण दरपत्रक अधिष्ठाता,श्री वंसतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ यांचे नावे सादर करावयाचे असुन दरपत्रकाच्या लिफाफयावर रुग्णालया करिता आवश्यक असलेल्या **कचऱ्यांची विल्हेवाट लावण्याकरीता ट्रॅक्टर ट्रॉली, वाहक सहित दरपत्रक** असे स्पष्ट नमुद करण्यात यावे. स्वतःचे नाव व पत्ता लिहावा अशा प्रकारे तयार करण्यात आलेले दरपत्रक दि. 03/01/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत कार्यालयात आणुन देण्यात यावे. तांत्रीक लिफाफा मध्ये दराचा उल्लेख करुन नये त्यामध्ये दर आढल्यास दरपत्रक अग्राह समजण्यात येईल.

प्राप्त होणा-या दरपत्रकातील तांत्रीक लिफाफे दि. 06/01 /२०२५ रोजी ४.०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये उघडण्यात येईल.सर्व प्रथम तांत्रीक बाबीचे लिफाफे उघडण्यात येईल. अटी शर्ती नुसार सर्व कागदपत्रे योग्य आढळल्यास किमंतीचा लिफाफे उघडण्यात येईल. तांत्रीक बाबीची पुर्तता झाली नसल्यास संबंधीत पुरवठादाराचे दरपत्रक रदद समजन्यात येईल.व त्याचे किमंतीचे लिफाफे उघडण्यात येणार नाही. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहता येईल.

न्युनतम ठरणा-या पुरवठादारास नमुद विनिदेर्ष्टेप्रमाणे सदर कचऱ्याची विल्हेवाट करीता दररोज गाडी संस्थेत उपलब्ध करणे बंधनकारक राहील. त्या करिता कोणत्याही प्रकारचा अगाउचा खर्च या संस्थेमार्फत अदा करण्यात येणार नाही, यांची नोंद घेण्यात यावी.

सदर वाहनाच्या वाहतुकी संदर्भातील दैनंदिन नोंदवही (लॉगबूक) ठेवण्यात यावे. सदरहू लॉगबूक वर तपासणी अधिकारी व कर्मचारी यांची स्वाक्षरी त्या दिनांकास घेण्यास यावी. सदरहू वाहन अचानक बंद /नादुरुस्त झाल्यास पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच वाहन चालक अनउपस्थित राहील्यास पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील अन्यथा सदर कचरा विल्हेवाट करण्याच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाल्यास किंवा अनुचित प्रकार घडल्यास सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची निश्चित करण्यात येईल.

जीथे दर द्यावयाचे नाही तिथे इच्छुक नाही असे स्पष्ट नमुद करावे.ती जागा रिकामी सोडण्यांत येवु नये.सर्व दर हे प्रती ट्रिप करिता सर्व कर समाविष्ट करुन नमुद करावे. अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारी दरपत्रक नाकारण्याचा अधिकार अधिष्ठांता  यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच यादी मधील काही बाबी किंवा मागविण्यांत येणा-या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रद्य करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे.

दर हे पेनने लिहीन्यात येऊ नये ते प्रिंट केलेले असावे.हस्ताक्षरात लिहिलेले दरपत्रक रदद करण्यात येईल. दर निश्चिती झाल्यावर आवश्यक ते बाब निहाय न्युनतम दर देणा-या पुरवठाद्वाराचे नाव दर निश्चिती करण्यात येईल. आवश्यकते नुसार वेळोवेळी आदेश काढण्यात येईल. आदेश प्राप्त होताच तीन दिवसामध्ये वाहन उपलब्ध करण्यात यावा. तसेच काही शंका असल्यास त्याकरिता किरकोळ भांडार विभागात संपर्क करावा.व त्यांचे देयक तिन प्रतीत मा.अधिष्ठाता, श्री.व.ना.शा.वै.महा. व रुग्णालय, यवतमाळ. यांचे नावाने देयक सादर करावे.

सदर दरपत्रका सबंधी आपणास काही तक्रार या कार्यालयास दाखल करावयाची असल्यास प्रथम आपल्या या कार्यायात तक्रार सबंधी रु.१०,०००/- शासन खाती जमा करावे लागेल.जर आपण दाखल केलेल्या तक्रारीत या कार्यालयास काही तथ्य आढलुन आल्यास आपणास आपण शासनखाती जमा केलेली रु.१०,०००/-रक्कम परत करण्यात येईल. तक्रारीमध्ये काही तथ्य न आढल्यास रु.१०,०००/- रक्कम परत करता येणार नाही व ती रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल.

**कचऱ्यांची विल्हेवाट लावण्याकरीता ट्रॅक्टर ट्रॉली, वाहक सहित दरपत्रक**

| अ.क्र. | वस्तुंचे नाव | परिमाण | दर |
|---|---|---|---|
| 1 | ट्रॅक्टर ट्रॉली, वाहक व डिझेल सहित वाहन भाडे तत्वावर | प्रती ट्रिप भाडे (श्री.व.ना.शास.वैद्य. महा.व रुग्णालय, यवतमाळ ते नगरपरीषद डम्पींग यार्ड, यवतमाळ.) | |

अधिष्ठाता
श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय
महाविद्यालय व रुग्णालय. यवतमाळ